# वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली दि. ०३/११/२०१७

## पोलीस - नक्षल चकमकीत एक जहाल  पुरुष नक्षलवादी ठार

- **२ हत्यारासह मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त**

उपविभाग भामरागड अंतर्गत कोठी पोलीस मदत केंद्र कोपर्शी जंगल परीसरात नारायणपुर जिल्हयाच्या सीमेवर गडचिरोली पोलीस नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना काल दिनांक ०२/११/२०१७ रोजी दुपारी ०४.३० ते ०५.०० वा. च्या दरम्यान पोलीस नक्षल चकमक झाली.   कोपर्शी जंगल ारीसरात पोलीस पथक नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना जंगलात दबा धरुन बसलेल्या अज्ञात नक्षलवादयांनी पोलीस पथकांच्या दिशेने पोलीसांना जीवे मारण्याच्या उददेशाने अंदाधुंद गोळीबार केला. पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल स्वसंरक्षणार्थ नक्षलवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. चकमकी दरम्यान एका जहाल पुरुष नक्षलवादयाला कंठस्नान घालण्यात पोलीस दलाला यश प्राप्त झाले. नक्षलवादयांच्या गोळीबारास न जुमानता पोलीस आगेकुच करीत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहुन नक्षलवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

चकमकीनंतर शोधमोहीम राबविली असता एक जहाल पुरुष नक्षलवादी मृतदेह व ०२ रायफलसह मोठया प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात आले. मिळुन आलेल्या मृत पुरुष नक्षलवादयांची ओळख्र अजुन पटली नसुन ओळख्र पटविण्याचे कार्य सुरु आहे. चकमकी नंतर पोलीस पथकांनी घटनास्थळाचा शोध घेतला असता घटनास्थळावर ०१ एसएलआर रायफल, ०१ एअर रायफल, ब्लास्टींगचे साहित्य, नक्षल लिखीत पुस्तके, मोबाईल फोन व ०१ खेचर तसेच मोठया प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात गडचिरोली पोलीसांना यश आले आहे. चकमकीनंतर सदर जंगल परिसरात तीव्र नक्षल विरोधी शोध मोहिम राबविण्यात येत आहे.

